महा मेट्रो

PUNE METRO

महा मेट्रो करणार २४ वृक्षांचे पुनर्रोपण

पुणे **४ सप्टेंबर**: पुणे शहराच्या पर्यावरणाच्या दीर्घकालीन रक्षणाच्या हेतूने पुणे मेट्रो प्रकल्पाची आखणी आणि अंमलबजावणी केली जात आहे. मेट्रो प्रकल्पाचे कार्यान्वयन झाल्या नंतर वैयक्तिक वाहनांच्या वाढीला नियंत्रण येणार असून वाहनांच्या हानिकारक वायू उत्सर्जनाला पायबंद बसणार आहे. पुणे मेट्रो रेल प्रकल्पाद्वारे सुरवाती पासूनच झाडांचे संवर्धन व पुनर्रोपणावर गंभीरपणे लक्ष देण्यात येत आहे.

नाशिक फाटा भोसरी येथील प्रस्तावित मेट्रो स्टेशनचे काम कारतांना पिंपळ व रेन्ट्री या एकमेकांत गुफलेल्या झाडांचे विस्थापन करावयाचे होते. या वृक्षांचा घेर अनुक्रमे ३.४० मी व ३.५० मी. इतका होता. ही दोन्ही झाडे सुमारे ३५ ते ४० वर्ष जुनी होती. पिंपळ व रेन्ट्री वृक्ष एकमेकांतगुफलेलेल्या या जोड वृक्षांचे अशक्य प्राय असलेले पुनर्रोपणाचे काम महा मेट्रोने विशेष प्रयत्न करून दिनांक ११.०८.२०१८ रोजी यशस्वीपणे पूर्ण केले आहे. या जोड वृक्षाभोवती सुमारे ७ फुट खोल खोदकाम करून जेसीबी व क्रेन च्या सहाय्याने प्रथमत: या वृक्षांना वेगेवेगळे करून त्यांचे पुनर्रोपण केले. हे काम सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजे पर्यंत पूर्ण केले. या जोड वृक्षांना एकमेकांपासून वेगळे करून कासारवाडी येथील जलनिसा:रण प्रकल्पाच्या आवारामध्ये पुनर्रोपणाचे काम यशस्वीपणे महा मेट्रोने केले आहे.

महा मेट्रो, पुणे मेट्रो रेल प्रकल्पाद्वारे तळजाई टेकडी हरित करण्याचा निश्चय केला असून सुमारे ४००० वृक्षांचे रोपण करण्याचे ठरविले आहे. आता पर्यंत १००० वृक्षांचे रोपण करण्यात आले असून प्रत्येक वृक्षाला स्वतंत्र क्रमांक देण्यात आला आहे. जेणेकरून एक-एक वृक्षावर प्रयत्न पूर्वक लक्ष ठेवून त्याच्या वाढीसाठी सर्व ते प्रयत्न करण्यात येतील. तळजाई टेकडी ही पुण्याची भूषण असून अश्या प्रकारच्या कार्यक्रमामुळे पुण्याच्या सौंदर्यात निश्तिच भर पडणार आहे. तळजाई टेकडीवर सकाळी फेरफटका मारणाऱ्या पुणेकरांची संख्या भरपूर असून त्यांना या गोष्टीने निश्चितच सुखद ध्का बसणार आहे.

नुकतेच पुणे मेट्रोला स्वारगेट येथील पीएमसी डेपोच्या कामामुळे विस्थापित होणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण करण्याकरिता परवानगी मिळाली आहे. पुणे महानगरपालिका आणि पुणे मेट्रो यांच्या संयुक्त विद्धयामाने लवकरच या वृक्षांचे पुनर्रोपण केले जाईल. पुणे मेट्रो ने आतापर्यंत विविध भागातील ४३० वृक्षांचे यशस्वीरीत्या पुनर्रोपण केले आहे.